आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२९ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- नौवहन क्षेत्रामुळे देशाच्या विकासाला चालना मिळत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं  प्रतिपादन

- नीती आयोगाच्या औद्योगिक उत्पादन क्षेत्रातल्या रोडमॅपचं पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

- मोंथा चक्रीवादळाच्या प्रभावामुळे मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**आणि**

- भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० क्रिकेट मालिकेतला पहिला सामना पावसामुळे रद्द

**<><><><><>**

नौवहन क्षेत्रामुळे देशाच्या विकासाला चालना मिळत असून भारताच्या नौवहन सामर्थ्यावर जगाचा विश्वास आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र  मोदी यांनी केलं. मुंबईत सागरी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातल्या प्रतिनिधींच्या परिषदेला ते आज संबोधित करत होते. मागच्या  दशकभरात नौवहन क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन झालं असून व्यापार आणि बंदरे पायाभूत सुविधांना चालना मिळाली असं प्रधानमंत्री म्हणाले. भारताचं सागरी क्षेत्र वेगानं प्रगती करत असून भारतातली बंदरं विकसनशील जगामधली सर्वात कार्यक्षम बंदरं म्हणून ओळखली जातात, असं कौतुक त्यांनी केलं. सरकारने नौवहन क्षेत्रात सुधारणांसाठी महत्त्वाची पावलं उचलली आहेत, शतकभर जुने कायदे बदलून २१ व्या शतकातले आधुनिक कायदे लागू केले आहेत. यामुळे स्टेट मेरिटाईम बोर्डाची क्षमता वृद्धिंगत झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट मोदी**

डिजीटायजेशनचा विस्तार करण्यात आला आहे, मर्चंट शिपींग ॲक्टमधे बदल करण्यात आला आहे, सरकारचा हस्तक्षेप कमी झाला आहे, असंही त्यांनी सांगितलं. सरकार जहाज बांधणी क्षेत्राला प्राधान्य देत असून या क्षेत्रात गुंतवणूक करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल उपस्थित होते.

**<><><><><>**

औद्योगिक उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राला मोठी संधी असून देश याबाबतीत जगाचं नेतृत्व करेल, तेव्हा महाराष्ट्र देशात आघाडीवर असेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं.

कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर या तीन क्षेत्रांतल्या प्रगतीचा मोठा प्रभाव सर्वच क्षेत्रांवर पडला असून याचा फायदा कसा करून घेता येईल, याचा विचार नीती आयोगाच्या रोडमॅपमध्ये केला असल्याचं फडनवीस म्हणाले. अत्याधुनिक कारखानदारी क्षेत्रातली जगातली पहिली प्रशिक्षण संस्था महाराष्ट्रात उभारण्याचा नीती आयोगाचा मानस असल्याची माहिती त्यांनी कार्यक्रमानंतर वार्ताहरांशी बोलताना दिली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, तसंच नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही.आर. सुब्रह्मण्यम उपस्थित होते .

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सांगितलं. शेतकरी नेते बच्चू कडू यांनी इतके विविध प्रश्न मांडलेले आहेत, की फक्त आंदोलनाच्या माध्यमातून ते सोडवता येणार नाहीत, त्यावर चर्चा करून रोडमॅप तयार करावा लागेल, त्यामुळे त्यांना चर्चेचं निमंत्रण दिलं आहे, असं ते म्हणाले. आंदोलनात झालेल्या गर्दीमुळे सामान्य

नागरिकांना त्रास झाला, त्यामुळे त्यांनी असे प्रकार टाळावेत, रेल रोकोसारखी आंदोलनं करू नये, चर्चेसाठी यावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

शेतकऱ्यांची कर्जमाफी, अतिवृष्टीग्रस्तांना तात्काळ मदत या आणि इतर मागण्यांसाठी शेतकरी संघटनांनी कालपासून आंदोलन सुरू केलं आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी आंदोलनासाठी पुढाकार घेतला असून यात किसान सभा, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पक्ष सहभागी झाले आहेत.

<><><><>

पुणे ग्रँड टूर ही पुण्याला एक नवी ओळख देणारी स्पर्धा असून या माध्यमातून अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. 'पुणे ग्रँड टूर' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या लेव्हल २.२ स्टेज शर्यतीचं बोधचिन्ह आणि जर्सी अनावरण फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत आज झालं. त्यावेळी ते बोलत होते.

या समारंभात स्पर्धेची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. या स्पर्धेत १८ देशांमधले ३४ संघ सहभागी होत आहेत.

<><><><>

डॉ संपदा मुंडे आत्महत्याप्रकरणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संपदा मुंडे यांच्या कुटुंबाशी आज दूरध्वनीवरून संवाद साधला. डॉक्टर संपदा यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण मुंडे कुटुंबाच्या सोबत आहोत असं आश्वासन गांधी यांनी यावेळी दिलं, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

डॉक्टर मुंडे आत्महत्याप्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करावं, अशी मागणी सपकाळ यांनी केली. तसंच संपदा यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांना

दोषींना शिक्षा व्हावी या मागणीसाठी काँग्रेस राज्यभरात आंदोलन करणार असल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त देशासह राज्यात सर्वत्र सरदार @१५० एकता अभियानांतर्गत विविध उपक्रम आयोजित केले आहेत. सर्व नागरिकांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन करण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यात ३१ ऑक्टोबर आणि ७ नोव्हेंबर रोजी भव्य पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं असून महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येनं भाग घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज केलं.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं मोंथा चक्रीवादळ काल आंध्रप्रदेशच्या किनाऱ्यावर धडकलं. मात्र आता त्याचा जोर कमी झाला असून ते वायव्य दिशेनं पुढे सरकत आहे असं हवामान विभागानं सांगितलं. मात्र वादळाच्या प्रभावामुळे मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड, परभणी , हिंगोली, बीड, जालना आणि धाराशिव जिल्ह्यांमधे पावसाने हजेरी लावली. यामुळे नदी, नाले, ओढ्यांना पूर आला असून विविध प्रकल्पांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. काढून ठेवलेल्या सोयाबीन पिकाला पावसाचा मोठा फटका बसला आहे.

अरबी समुद्रावर तयार झालेला कमी दाबाचा पट्टा गेले ३ तास मुंबईपासून ४१० किलोमीटर अंतरावर स्थिर राहिला असून तो येत्या ३६ तासात ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करावा लागला. ऑस्ट्रेलियात कॅनबेरा इथं झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताच्या ५ षटकात १ बाद ४३ धावा झाल्या असताना पावसामुळे खेळ थांबवावा लागला. पुन्हा खेळ सुरु झाल्यानंतरही पाऊस आल्यानं भारताची धावसंख्या १ बाद ९७ असताना सामना रद्द करण्यात आला.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही, त्यामुळे आगामी निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरले जाणार नाहीत असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. काही अपवाद वगळता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेतल्या जातात. त्यासाठी व्हीव्हीपॅट जोडणीची सुविधा असलेली मतदान यंत्रं विकसित करण्याबाबत देशातील सर्व राज्य निवडणुक आयोगांची टेक्निकल इव्हॅल्यूशन कमिटी अभ्यास करत आहे, तिचा अहवाल अद्याप न आल्यानं व्हीव्हीपॅटचा वापर शक्य नाही असं आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

यंदाच्या खरीपातल्या सोयाबीन, उडीद आणि मूग खरेदीसाठी आजपासून नोंदणी सुरू होत असून, १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदीला सुरुवात होणार आहे. पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. खरेदीसाठी ॲप आणि पोर्टलवर नोंदणी केली जाणार आहे. खरेदी केंद्रांवरची गर्दी टाळण्यासाठी ॲपवर तारीख आणि वेळ नमूद करण्याची सोय आहे. त्यामुळे नोंद केलेल्या वेळेला शेतकऱ्यांनी आपला शेतमाल केंद्रावर न्यावा, असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय तर कोकणात किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**